Link the uploaded papers the first Page /Full paper (With author & affiliation details) on the institutional website

Smt. V.D. Sr. College Daulatnagar

Year 2021

| No | Title of the paper | Name of Author | Department of the Teacher | Name of the journal | Year of Publication | ISBN/ISSN & Link |
|---|---|---|---|---|---|---|
| | Yashwantrao Chavan yancherajkiya Karya | Dr.Sunil Sate | Politics | UGC listed journal | 2021 March | ISSN : 2455-6211 wwwijiaresm Co |
| | | | | | | |
| | Thoughts ofDr.Babasaheb Ambedkar | V.N. Kamble | Marathi | UGC listed journal | 2021 April | ISSN:2454-7905 |
| | Sant.chokhamelayanchyasahityatilsamatechevichar | V.N. Kamble | Marathi | UGC listed journal | Marach 2021 | ISSN :2277-5730 www.sjifactor.Co |
| | Thoughts &Works ofDr.Dr.Babasaheb Ambedkar | V.N. Kamble | Marathi | UGC listed journal | Sep 2021 | ISSN : 2278-9308 |
| | Annabhau sate yanche Sahitya vakalavishya Bhumika | Dr.S.Ssate | Politcs | UGC listed journal | 2021 | ISSN:2320-4494 |
| | Netaji subhashchandraboseyanchiyogdan | Dr.S,Ssate | Politcs | UGC listed journal | 2021 | ISSN:2454-7905 |
| | Mahatma Phule Yani Kelele Samaj Prabodhan | Dr.S,S sate | Politcs | UGC listed journal | 2021 | ISSN 2455-1511 |

Web link of Research paper by title ,Author ,Name ,Dept ,Year Of Publication

Link the uploaded papers the first Page /Full paper (With author & affiliation details ) on the institutional website

Year 2021

Web link of Research paper by title ,Author ,Name ,Dept ,Year Of Publication

Link the uploaded papers the first Page /Full paper (With author & affiliation details ) on the institutional website

Year 2022

| Sr.No | Title of the paper | Name of Author | Department of the Teacher | Name of the journal | Year of Publication | ISBN/ISSN & Link |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MadhyayuginsanthKavayatricheyogdan | Dr.S.S.Sate | Politics | U.C.G jurnal | March 2022 | ISSN :2455-1511 |
| 2 | Netaji subhashchandrabose Bhartiya swatantryacheshilpakarjivankarya | Dr.S.S. Sate | Politics | U.C.G | 2022 | ISSN 2454 |
| | | | | | | |

Web link of Research paper by title ,Author ,Name ,Dept ,Year Of Publication

Link the uploaded papers the first Page /Full paper (With author & affiliation details ) on the institutional website

Year 2023

| Sr.No | Title of the paper | Name of Author | Department of the Teacher | Name of the journal | Year of Publication | ISBN/ISSN & Link |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Bhartiya samaj vavyasatatilstreeche stan | Dr.S.S.Sate | Politics | U.G.C journal | 2023 | ISSN :25818848 |
| 2 | Babasaheb AmbedkarancheSamajikLokashahivichar | Dr.S.S. Sate | Politics | U.C.G journal | 2023 | ISSN :258-8848 |
| 3 | 1960 nantarchyamarathitilstreelekhika | V.N .kamble | Marathi | U.C.G Journal | 2023 | ISSN: |

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - II / HINDI

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | भारतीय समाज व कुटूंबातील मानवी मूल्ये<br>**प्रा. वैभव नानासाहेब कांबळे** | ७१-७४ |
| १४ | मुलगी असावी<br>**Prof. (Dr.) A. M. Gurav** | ७५-७९ |
| १५ | मानवी मूल्ये व नीतितत्वे<br>**श्री. नोळे बसनदास हिरा** | ८०-८७ |

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १३. भारतीय समाज व कुटूंबातील मानवी मूल्ये

प्रा. वैभव नानासाहेब कांबळे
श्रीमती विजयादेवी देसाई सिनिअर कॉलेज, दौलतनगर, ता. पाटण, जि. सातारा.

प्रस्तावना

जगातील सर्वात मोठी 'लोकशाही'शासन व्यवस्था म्हणून भारताकडे पाहिले जाते. विविध धर्म, संस्कृती, भाषा, परंपरा व चालीरिती मधील वैविध्य असतानाही एकतेचे दर्शन घडविणारे अनेक प्रसंग नजरेस पडतात. परंतु काही घटनामूळे भारतीय ऐक्याला बाधा आणण्याचे कार्य घडताना दिसते. जातीयवाद, दहशतवाद, हत्याकांड, बलात्कार या सारख्या कौर्याची कृत्येमूळे शांततेचे वातावरण दुषित करण्याचे काम केले जाते. हिंसाचार वाढीस लागताना दिसतो.खैरलांजी प्रकरण अगर दिल्लीतील निर्भया प्रकरणातून क्रूरतेची परिसीमा गाठलेली दिसते. येथील फक्त प्रादेशिक भिन्नत्वच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक विषमता ही मोठ्या प्रमाणात दिसते. भारतीय लोकशाही टिकवायची असेल आणि तिची विश्वासर्हता जोपासायची असेल तर भारतीय समाज व्यवस्थेचा व कुटूंब व्यवस्थेबाबतची मानवी मूल्यांचा पुनर्विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

मूल्य स्वरुप व संकल्पना

'मूल्य'ही संकल्पना तत्वज्ञानशास्त्राचा भाग आहे.संपूर्ण मानवजातीचे मूलभूत प्रश्न अभ्यासण्याचे काम ते करते.मूल्यांच्या विविध परिमितीय आधारावर मानवी वर्तनाबंधाचे नियमन करणारे अनेक पैलू विकसीत झाले आहेत.समाजातील मानवी संबंधाना आकार देणेचे काम ही मूल्ये करतात.

टॅलकॅाट- या समाजशास्त्राने मूल्यांविषयी दोन दृष्टीकोन सांगितले आहेत. पहिले म्हणजे त्यांनी त्यांच्या व्यवस्था सिद्धांतात (system Theory) संस्कृती व्यवस्थेचा उल्लेख केला असून व्यकती वर्तनात व्यक्तींनी कोणत्या कर्तव्यांचे पालन करावयाचे याचे निर्देश मूल्ये करतात.तर संरचनात्मक कार्यात्मक सिद्धांतात त्यांनी मूल्यांचा समावेश समाजाचा एक संरचनात्मक घटक म्हणून केला आहे.मूल्य म्हणजे आपली उद्दिष्टे, कल्पना,इतर व्यक्तींच्या संदर्भात आपली जबाबदारी किंवा कर्तव्ये पार पाडणारा भावनात्मक घटक होय.

ए.एल.बरट्राड- 'व्यक्तीत कर्तव्याची व जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याची मूल्यांची भूमिका स्पष्ट केली आहे.'

कायदेविषयक दृष्टीकोनातून मूल्य विचार करताना,कोणत्याही समाजाच्या कायदयाचा मुख्य उद्देश आणि कार्य म्हणजे मानवा-मानवांतील संबंध नियमीत करणे आणि समाजातील संघर्षाची तीव्रता कमी

करून समाजात शांतता,सुरक्षितता निर्माण करणे आणि त्याचबरोबर मानवजातीच्या वर्तनात चांगल्या आणि सुव्यवस्थित वर्तनाची स्थापना करून संघर्षरहीत समाज निर्माण करणे होय.

थोडक्यात मानवी मूल्यांचा संबंध हा समाजातील व्यक्तीच्या वर्तनात्मक अनुबंध होय.व्यक्ती - व्यक्तींनुसार मूल्यांचे स्वरुप बदलत असले तरी काही समाजाची मूलभूत मूल्ये समानच असतात व ती सर्वांसाठी असतात.चांगली व वाईट मूल्ये ही सापेक्ष आहेत. कारण त्यांचे स्वरुप समाजानुसार बदलताना दिसते.

भारतीय समाज व्यवस्था व कुटूंब व्यवस्था

भारत हा कृषी प्रधान देश आहे. आजही ७०% समाज ग्रामीण भागात वास्तव्य करतो.विविध धर्म,संस्कृती ,परंपरा ,सणवार,रितीरिवाज यातील वैविध्यता आहे.ही वैविध्यता जपण्याचे काम येथील ग्रामीण परंपरा ,सणउत्सवांनी केले आहे. येथील कुटूंबामधून मिळणारे संस्कार,शिकवण प्रत्येक सदस्यांनी मिळते.कुटूंब व्यवस्थेचा विचार अधिक प्रेरक आहे. मार्शल जोन्स- 'कुटूंब ही लैंगिक संबंधावर आधारलेली एक सामाजिक संस्था असून प्रजोत्पादन व अपत्यांचे संगोपन ही कार्ये आहेत.' सामान्यता कुटूंब पदधतीचे दोन प्रकार दिसतात.१) केंद्र कुटूंब २) संयुक्त कुटूंब

केंद्र कुटूंब- 'पती,पत्नी व त्यांची अविवाहीत मुले मुली एवढेच सदस्य एकत्र राहात असलेल्या कुटूंबास केंद्र कुटूंब म्हणतात.' व यांचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा महानगरी,शहरी भागात अधिक असलेचे दिसते.

संयुक्त कुटूंब-'पती -पत्नी ,त्यांची विवाहीत मुले,सुना अविवाहीत मूली,विवाहीत व अविवाहीत नातवंडे यांचे इतर काही निकटवर्ती आप्त एकत्र राहतात त्यास संयुक्त कुटूंब होय.'तर डॉ. इरावती कर्वे यांचे मते,'एकाच निवासस्थानात राहणा-या ,एकाच स्वयंपाकगृहातील अन्नसेवन करणा-या,मालमत्तेत समान मालकी हक्क असणा-या,रक्तासंबंधी असणा-या व्यक्तीचा समुह म्हणजे संयुक्त कुटूंब होय.'

यखेरीज १९८० च्या दशकानंतर 'लिव्ह इन रिलेशनशीप 'चा नव मध्यम वर्ग सर्व जाती -धर्मामध्ये अस्तित्वात येताना दिसतो. विवाह प्रथेतील अनिष्ट परंपरा व त्यातील क्रूर व्यवहारांमुळे कौटुंबिक जबाबदारीची पासून चे पलायन ही त्याची प्रमूख कारणे होत.विवाहाशिवाय एकत्र राहण्याच्या अस्तित्वामधून एका अर्थी शहही दिला जात असलेचे दिसते.परंतु कायदेशीर मान्यता नसलेने ग्रामीण भागात या कुटूंब पद्धतीचे प्रमाण नगन्य दिसते.

समाज किंवा धर्म व जात या संकल्पना व्यामीश्र स्वरुपाच्या आहेत.विशिष्ट हेतूने किंवा कर्माने एक असलेल्या मनुष्य समूहास समाज म्हणतात.समाजात विविध कुटूंबाचा समावेश असताना दिसतो.त्याचे स्वरुप व व्याप्ती ही कुटूंबाच्या तुलनेने मोठी आहे.

भारतीय समाज आणि कुटूंब व मानवी मूल्ये यांच्यातील अनुबंध

परंपरागत ग्रामीण समाजात जन्मावरून जात व कामावरून दर्जा ठरविण्याची प्रथा भारतीय समाजात अस्तित्वात होती. आपल्या पेक्षा कनिष्ठ जातीतील व्यक्तीशी शारीरिक व सामाजिक संपर्क करण्यास जाती व्यवस्थेने मनाई केली होती. परंतु फुले शाहू, आंबेडकर यांनी सामाजिक जीवनातील अस्पृश्यता निवारण्याचे व लोकोद्धाराचे अलौकिक कार्यामूळे व भारतीय राज्यघटनेने धर्म स्वातंत्र्य दिल्याने ही कनिष्ठ वर्गाची होणारी गळचेपी व कुचंबनेचे प्रमाण कमी झालेले दिसते. 'धर्मनिरपेक्षता'हे मानवी मूल्यांची रुजवण झालेली दिसते. सर्वधर्म सहिष्णुता वाढीस लागते. शिक्षणाचा मूलभूत अधिकार सामान्य माणसाला मिळाल्याने तो शिकू लागला, विचार करू लागला.विज्ञानवादी दृष्टीकोन जोपासू लागला. साहजिकच अंधश्रद्धेपासून तो दूर गेला. सहज मोकळेपणाने नोकरी करू लागला.त्यास आर्थिक सुबत्ता आली. त्याचे जीवनमान उंचावले.

पितृसत्ताक कुटूंब पध्दती असलेने कुटूंब प्रमुख देश,देव व धर्म यांचे धडे दिले जातात.राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय एकात्मकतेच्या विचारांचे संस्कार दिले जातात. व इतर अन्य सदस्यांची आजारपण, अपंगत्व, वार्धक्य अशा हतबल अवस्थेत व्यकतीची कुटूंब प्रेमाने काळजी घेते, धीर देते, पाठीशी राहते ,त्याचे मनोधैर्य वाढीस लागते. कुटूंबातील व्यक्तीला माया, प्रेम, ममता, जिव्हाळा, सहकार्य मिळू लागले.

बहुतेक कुटूंबाचा शेती हाच व्यवसाय असल्याने सर्व सदस्य कष्ट करतात.कुटूंबातील सर्व सदस्यांना मालमत्तेचे समान वाटप केले जाते. त्यामुळे सर्व सदस्यांना उपभोग घेता येतो.सहनशीलता व प्रामाणिकपणा यांचे शिक्षण दिले जाते. त्याच बरोबर कुटूंबातील वृद्ध व्यक्ती व अनुभवी मंडळी लहान मुलांच्यावर आदर्श मूल्ये, रितीरिवाज, आज्ञापालनाची वृत्ती, शिस्त, संस्कार, नीटनेटकेपणा व स्वच्छतेची जाणीव होताना दिसते. याउलट शहरी कुटूंबात माता- पिता नोकरी निमित्ताने व्यस्त असलेने लहानांवर संस्कारक्षम वातावरण दिसत नाही. व्यस्त जीवन पद्धतीमुळे मुलांना पाळणाघरात सोपविले जाते. त्यामूळे त्या मुलांच्या संगोपनात अडचणी निर्माण झालेल्या दिसतात. संयुक्त कुटूंब पध्दतीमध्ये सामाजिक संरक्षण अधिक लाभते.

कौटुंबिक व्यवसायाचे प्रशिक्षण ग्रामीण भागात घरातच मिळते.परंपरागत व्यवसायाचे धडे ग्रामीण भागात बालपणापासून मिळतात. उदा- कुंभार, बुरूड. व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा आरोग्य, संरक्षण या गरजांची पूर्तता कुटूंबाकडून होताना दिसते.

समारोप

आजच्या युगात नष्ट होत चाललेली एकत्र कुटूंब पद्धती. त्यामुळे संस्काररुपी मिळणारी मानवी मूल्ये लोप पावतात की काय अशी भिती निर्माण झालेली दिसते.बदलत्या कुटूंब पध्दतीमूळे मानवी मूल्यांचे संवर्धन हे एक मोठे आव्हान निर्माण झालेले आहे.विभक्त कुटूंब पद्धतीमुळे आज कौटुंबिक व

सामाजिक व सांस्कृतिक वातावरण दूषीत होत चालले आहे. जातीयवाद, दंगली, जाळपोळ, हिंसाचार, भ्रष्टाचार, एकतर्फी प्रेम प्रकरण, बलात्कार या सारख्या घटनांचे प्रमाण वाढत आहे.

हे वाढते प्रमाण कमी करण्याची जबाबदारी युवा वर्गाची आहे. भावी युवापिढी सुसंस्कारी, मानवी मूल्याची जोपासना करणारी हवी तर मानवी नाते संबंध टिकून राहतील. राष्ट्रभक्ती, सर्वधर्म समभाव, प्रामाणिकपणा, सहनशिलता, क्षमाशीलता, वैज्ञानिक दृष्टीकोन, श्रमप्रतिष्ठा या मानवी मूल्यांची रुजवण करणेची जबाबदारी शाळा, महाविदयालयांची आहे. फॅशन च्या नावाखाली होणारी मानवी मूल्यांची पायमल्ली थांबविणे काळाची गरज आहे.

संदर्भ

1. समकालीन भारतीय समाज-विदयुत भागवत- डायमंड प्रकाशन
2. मानवी हक्क आणि सामाजिक न्याय-प्रा.पी.के.कुलकर्णी- डायमंड प्रकाशन
3. ग्रामीण समाजशास्त्र- शिवाजी विदयापीठ,कोल्हापूर
4. जातीअंताचे समाजशास्त्र-प्रा.संजयकुमार कांबळे
5. समाजशास्त्र परिचय- माने माणिक-विदया प्रकाशन नागपूर
6. भारतीय समाजातील नैतिक मूल्ये-संपा.खैरनार दिलीप- डायमंड प्रकाशन
7. आदिवासींचे समाजशास्त्र- माने माणिक,ए.ए.गढवाल, विदया प्रकाशन नागपूर

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.)
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | स्त्रियांवरिल लैंगिक अत्याचार : एक ज्वलंत सामाजिक समस्या<br>**डॉ. कन्नाडे ममता कार्तिक** | १-५ |
| २ | २१ व्या शतकात गोपाळ गणेश आगरकरांच्या शैक्षणिक विचारांची प्रस्तुतता<br>**प्रा. सुरेश नामदेव दांडगे** | ६-१० |
| ३ | बी.एड. छात्राध्यापिकांची स्त्रियांच्या लैंगिक छळाबाबतची जाणीव जागृती एक अभ्यास<br>**डॉ. नवनाथ ज्ञानदेव इंदलकर** | ११-१६ |
| ४ | Information Technology and Teaching Learning Process (Education)<br>**डॉ. सर्जेराव पांडुरंग चव्हाण** | १७-२२ |
| ५ | नवीन सामाजिक समस्या तणतणाव<br>**सहा. प्रा. किरण अशोक आवनावे**<br>**डॉ. आर. बी. क्नबट्टे** | २३-२६ |
| ६ | भारतीय शेती समोरील आव्हाने व उपाययोजना एक अभ्यास<br>**डॉ. अे. जी. मगदूम** | २७-३४ |
| ७ | आर्थिक विकासात माहिती तंत्रज्ञान उद्योगांचे योगदान<br>**प्रा. डॉ. के. डी. पाटील** | ३५-३८ |
| ८ | शिक्षक उत्तरदायित्व : पार्श्वभूमी, संकल्पना व वैशिष्टये<br>**डॉ. शिंदे भागवत असाराम** | ३९-४२ |
| ९ | महाराष्ट्रातील आधुनिक विवाह पध्दतीतून वाढते घटस्फोट : एक सामाजिक समस्या<br>**डॉ. शैलजा का. माने** | ४३-४८ |
| १० | लोकशाही संस्थांची विश्वसनियता<br>**प्रा. डॉ. सुनिल संभाजी साठे**<br>**प्रा. रुपेश रमेश जाधव** | ४९-५२ |
| ११ | भारतातील उच्च शिक्षणातील समस्या व आव्हाने<br>**प्रा. बी. आर. नदाफ** | ५३-५६ |
| १२ | भारतातील विद्यापीठाची सद्यस्थिती आणि उच्च शिक्षणातील समस्या<br>**प्रा. किशोर सुतार**<br>**प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे** | ५७-६६ |

# १०. लोकशाही संस्थांची विश्वसनियता

**प्रा. डॉ. सुनिल संभाजी साठे**
श्रीमती. विजयादेवी देसाई महाविद्यालय दौलतनगर (मरळी).
**प्रा. रुपेश रमेश जाधव**
सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज कराड.

प्रस्तावना

ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून ब्रिटिशांचे भारतात आगमन झाले आणि भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत हिंदुस्थानातील पंजाब, सिंध, मध्यप्रांत व दक्षिणेतील राज्य यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करून ब्रिटिशांनी राजकीय सत्ता हस्तगत केली. पाश्चात्य शिक्षण व विचारामधून प्रस्थापित भ्रम, अज्ञानापासून व सामाजिक विषमतेपासून मानवाची मुक्ती करण्याचे प्रयत्न असे अनेक धडे या राजवटीने भारतीयांना दिले. तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मुल्यावर आधारीत लोकशाहीची संकल्पनाही या सोबत आली.

26 जानेवारी 1950 रोजी भारतीय गणराज्याचे संविधान अमलात आले. त्या दिवशी खऱ्या अर्थाने आपल्या प्रदिर्घ ऐतिहासिक कालखंडात पहिल्यांदा भारताने आधुनिक संस्थात्मक चौकट असलेल्या संसदिय लोकशाहीचा स्वीकार केला.[1] या पार्श्वभूमीवर भारतातील लोकशाहीतील संस्था, त्याचे स्वरूप व त्याचे कामकाज आणि त्यांची विश्वासार्हता याचा अभ्यास होणे महत्वाचे व गरजेचे आहे. त्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**न्यायपालिका**

भारतीय लोकशाहीमध्ये अत्यंत महत्वाची संस्था म्हणून न्याय पालिकेकडे पाहिले जाते. आधुनिक लोकशाही राज्यांसाठी न्यायव्यवस्था अनिवार्य झाले असून कायद्याचा अर्थ लावून विवाद मिटविणे, व्यक्तीचे हक्क अबाधित ठेवणे अशा महत्वाच्या कामाकरिता न्यायव्यवस्था असावीच लागते. म्हणून अशी ही महत्वपूर्ण संस्था शासनाच्या इतर दोन्ही अंगाच्या नियंत्रणापासून, हस्तक्षेपापासून व वर्चस्वापासून मुक्त असावी.[2] तसेच बहुमताच्या जोरावर केलेला कायदा घटनेशी सुसंगत आहे की विसंगत हे तपासण्यासाठी न्याय पालिकेला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार घटनेने दिला आहे.

त्यामुळे आपण आपणाला न्याय मिळेल या अपेक्षेत असतो. परंतु केंद्र सरकारने न्याय पालिकेत हस्तक्षेप केल्याने सर्व सामान्य जनतेच्या अपेक्षांना तडा गेला. तो दिनांक 12 जानेवारी 2018 रोजी. त्या दिवशी भारताच्या इतिहासात अशी एक घटना घडली की त्यामुळे सारा देशसच हादरला. त्या धक्क्यातून देश अद्यापही सावरलेला नाही. त्या दिवशी असे घडले की, दुपारी 12 वाजून 15 मिनिटांनी सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायमूर्ती जे. चेलमेश्वर, न्या. रंजन गोगोई, न्या. मदन लोकुर व कुरीयन जोसेफ यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आवारातच पत्रकार परिषद घेतली. व पत्रकारासमोर आपल्या मनातील वेदना त्यांनी मांडल्या. आपले म्हणणे संपूर्ण देशापुढे जावे म्हणून त्यांनी हा मार्ग स्वीकारला. या पूर्वी असे कधीही घडले नव्हते. या चार न्यायमुर्तीची आजवरची कारकिर्द ही अतिशय

देदिप्यमान आहे. त्यांच्या कारकिर्दीवर कोणीही शंका घेतली नाही. या चारही न्यायाधीशांनी निःपक्षपातीपणे न्यायनिवाडा केला आहे. या चार न्यायाधिशांनी पत्रकारासमोर काय म्हटले ते अत्यंत महत्वाचे आहे. ते म्हणतात की, 1) देशातील लोकशाही धोक्यात आली आहे. 2) प्रश्न सोडविण्याचा आमचे म्हणणे पटवून देण्याचा आम्ही खूप प्रयत्न करून पाहिला पण जेव्हा वरिष्ठांकडून म्हणजे सरन्यायाधिशांकडून कोणताच प्रतिसाद आम्हास मिळाला नाही. तेव्हा शेवटचा उपाय म्हणून आम्ही जनतेपुढे यायचे ठरविले. 3) सर्वोच्च न्यायालयाचा कारभार योग्य पध्दतीने चाललेला नाही. 4) आम्ही जर आज निमुटपणे गप्प राहीलो तर पुढची पीढी आम्हास माफ करणार नाही. असे वाटल्याने आम्ही आमचे म्हणणे पत्रकारापुढे मांडत आहोत.[3] अशा प्रकारे या चार न्यायमुर्तीनी अशी चिंता व्यक्त केली आहे. लोकशाही धोक्यात आली असून सर्वोच्च न्यायालयाच्या संपूर्ण व्यावहारावर कोणी तरी बाहेरूण हस्तक्षेप करत आहे. असे होणे म्हणजे न्याय व्यवस्था कमजोर करण्यासारखे आहे. अशा प्रकारामुळे जनतेचा न्यायलयावरील विश्वास कमी होऊन लोक न्याय मागण्यासाठी न्यायालयात न जाता ते इतर कोणती तरी व्यवस्था शोधतील.

### निर्वाचन आयोग

निवडणूका निर्भयपणे पार पाडण्यासाठी घटनेच्या 324 व्या कलमानुसार निवडणूक आयोगाची तरतूद करण्यात आली आहे. निर्वाचन आयोग हा प्रत्यक्षात कसा क्रियान्वित होतो, किती कार्यक्षमपणे व निष्पक्षपातीपणे काम करतो आणि राजकीय पूर्वग्रहापासून व दडपणापासून मुक्त असतो यावर देशाच्या लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते.

निवडणूक प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास टिकून रहावा व वाढावा यासाठी पक्षीय सरकारच्या हस्तक्षेपापासून व नियंत्रणापासून मुक्त असलेल्या यंत्रनेकडे ते सोपविलेले असणे गरजेचे ठरते. भारतीय संविधानकर्त्यांना याची जाणीव होती. त्यांनी निवडणूकांची कार्यवाही पार पाडण्यासाठी अशा स्वतंत्र यंत्रणेची निर्मिती केली. सर्व स्तरांवरील लोकप्रतिनिधींची निवड न्याय व मुक्त निवडणूकांच्याद्वारे होईल याची हमी निर्वाचन आयोग देतो.[4] यासाठी निवडणूक आयोगाने निवडणूकीच्या काळात कडक आचारसंहिता सुरू केली परंतु अलिकडे आचारसंहितेचे नियम पाळताना सत्ताधारी राजकीय पक्ष दिसत नाही. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणून 2019 च्या झालेल्या लोकसभा निवडणूकीचे देता येईल.

लोकसभा निवडणूकीतील प्रचारात आरोप–प्रत्यारोप होत असताना सत्ताधारी–विरोधकांनी परस्पर विरोधात आचारसंहिता भंगाच्या तक्रारी दाखल केल्या होत्या. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप अध्यक्ष अमित शहा यांच्या भाषणातील वक्तव्य विरोधातही तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र निवडणूक आयोगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा यांना क्लिनचीट देण्यात आली होती. तर, विरोधकांना नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या त्यामुळे निवडणूक आयोग पक्षपातीपनाणे वागत असल्याचा आरोप करण्यात आला होता. निवडणूक आयुक्त अशोक लवासा यांनी क्लीन चीटवर आक्षेप घेतले आहेत. क्लीन चीट देण्याच्या निर्णयाबाबत आयोगातील आयुक्तामध्ये असलेली मतभिन्नता रेकॉर्डवर घेण्याची मागणी अशोक लवासा यांनी मुख्य निवडणूक आयुक्ताकडे केली आहे. सुप्रिम कोर्टाच्या खंडपीठाच्या निर्णय प्रक्रियेसारखी निर्णय प्रक्रिया असावी अशी मागणी लवासा यांनी केली आहे. त्यामुळे अल्पमतातील मुद्दे रेकॉर्डवर येतील असे त्यांनी पत्रात नमुद केले आहे. लवासा यांच्या पत्रामुळे निवडणूक आयोगात सर्व काही आलबेल नसल्याची चर्चा सुरू झाली आहे. तसेच निवडणूक आयोग हे पंतप्रधान नरेंद्र मोदिंच्या हातातील खेळणे झाले

असल्याने अशोक लवासा यांच्या पत्रावरूण स्पष्ट होत असल्याचे काँग्रेस प्रवक्ते रणदीप सुरजेवाल यांनी सांगितले आहे.[5]

**भारतीय रिझर्व्ह बँक**

भारतीय लोकशाहीमधील तिसरी महत्वाची संस्था म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक होय. भारतीय रिझर्व्ह बँक ही भारत सरकारने स्थापन केली आहे. 1926 च्या यंग हिल्टन आयोगाच्या शिफारशीवरून तसेच गोलमेज परिषदेच्या वतीने भारतासाठी एक मध्यवर्ती बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी संसदेत 6 मार्च 1934 ला आर.बी.आय कायदा संमत करण्यात आला आणि 1 एप्रिल 1935 ला रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ची स्थापना करण्यात आली. या बँकेच्या स्थापनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

राजकारणातील मतभेद आणि भिन्न विचारधारेमुळे तसेच सरकारच्या हस्तक्षेपामुळे देशाची मुख्य अर्थवाहिनी असलेल्या या अतिमहत्वाच्या संस्थामध्ये अनेक घोटाळे झाल्याचे आपणास दिसून येते. देशात वर्षभरात 71 हजार 543 कोटींचे बँक घोटाळे झाले आहेत.

बँकामध्ये होणाऱ्या आर्थिक घोटाळ्याचे प्रमाण कमी होणे अपेक्षित असतानाच गेल्या आर्थिक वर्षामध्ये बँक गैरव्यवहारामध्ये वार्षिक निकषाच्या आधारे तब्बल 15% नी वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने 2018–19 या आर्थिक वर्षाकरिता आपला अहवाल प्रसिध्द केला. गेल्या आर्थिक वर्षात बँकामध्ये एकूण 6,801 आर्थिक घोटाळे झाले व त्यांची एकूण व्याप्ती 71,542.93 कोटी होती असे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. यामध्ये 100 कोटी रुपयाहून अधिक रकमेच्या घोटाळ्याचा आकडा सर्वाधिक म्हणजे 52,200 कोटी रुपयावर आहे. या घोटाळ्यामध्ये सरकारी बँका आघाडीवर असून त्यानंतर खाजगी व विदेशी बँकांचा क्रमांक लागतो. या कालावधीमध्ये सरकारी बँकांमध्ये आर्थिक घोटाळ्याची 3,766 प्रकारण घडली व त्यातून 64,509 कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असे या अहवालात नमुद करण्यात आले आहे.

यातील धक्कादायक बाब म्हणजे हे आर्थिक घोटाळे उघडकीस येण्यास कमालीचा विलंब झाल्याचे दिसते. घोटाळ्याचा दिनांक बँकांच्या लक्षात येण्याच्या कालावधीत सरासरी 22 महिन्याचे अंतर आहे. शंभर कोटी रूपयाहून अधिक रकमेच्या घोटाळ्यांच्या प्रकरणी तर हा कालावधी 55 महिन्याचा आहे. हे घोटाळे प्रामुख्याने कर्जविषयक असून त्यानंतर बनावट कागदपत्रांच्या साहाय्याने झालेले गैरव्यवहार, कार्ड/इंटरनेट संबंधी फसवणूक आदींचा क्रमांक लागतो.[6]

**समारोप**

अशाप्रकारे भारतीय लोकशाही संस्थाच्या कार्याचे स्वरूप राहिले असून या देशातील सरकार व संस्था जनतेच्या पैशावर कष्टावर, मतदानावर व मान्यतेवर प्रस्थापित झालेल्या आहेत. जनतेचे हित, संरक्षण सुरक्षितता व समान न्याय या प्रमुख भूमीका असलेल्या संस्थेवर एकाधिकारशाहीचा हस्तक्षेप व सर्वस्व निर्माण झाले असल्याने त्या निष्पक्षपातीपणे कार्य करू शकत नाहीत. या देशात राजकारणाला सत्ताकारणाची आणि लोकशाहीला हुकूमशाहीची बाधा झाल्याने या संविधानिक संस्था सत्ताधारी पक्षाच्या हातातील खेळणं बनल्या आहेत.

ज्या देशाची लोकशाही ज्या संस्थावर अवलंबून आहे, त्या संस्थेवर सत्ताधारी पक्षाने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यामुळे 'लोकाची सत्ता म्हणजे लोकशाही' हि व्याख्या खोटी ठरत आहे. देशातील शोषीत, अपेक्षित, स्त्रिया, दलित, अल्पसंख्याक लोकांना राजकारणात, अर्थकारणात व समाजकारणात आत्मविश्वासाने उभे करण्याचे महत्वपूर्ण कार्य या संस्थाकडे मोठ्या विश्वासाने संविधानाने सोपविले आहे. परंतु या देशातील जातीयवादी, धर्मांध विचार सरणीच्यालोकांच्याकडे सत्तेची सर्व सुत्रे गेल्याने या संस्था धोक्यात आल्या आहेत. या देशाचे आपण विश्वस्त आहोत मालक नाही या संकल्पनेचे भान व ज्ञान सत्ताधाऱ्यांना राहिले नाही असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. कश्यप सुभाष सी. अनुवादक – न. व पाटील, आपली संसद'' नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया प्रकाशन 2006 पृ. क्र. 1
2. डॉ. भोळे भा. ल. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, 2003, पृ. क्र. 229
3. प्रा. मेणसे आनंद 'सर्वोच्च न्यायालयातील न्यायदान व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह', प्रबोधन प्रकाशन ज्योती, वर्ष 29 अंक 363 फेब्रुवारी 2018 पृ. क्र. 44
4. डॉ. भोळे भा. ल. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लीशर्स, नागपूर, 2003 पृ. क्र. 373
5. Lokmat. Com
6. महाराष्ट्र टाइम्स कॉम – 30 / 1 / 2019

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

ENGLISH / MARATHI PART - III / HINDI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत तुकारामांच्या अभंगातील पत्नी मुल्य<br>**डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे** | १-५ |
| २ | संत साहित्यातील लोकशिक्षण<br>**डॉ. ममता फुके** | ६-१० |
| ३ | संत ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील नामभक्ती<br>**प्रा. डॉ. डिगोळे बालाजी विठ्ठलराव** | ११-१५ |
| ४ | संत निळोबांच्या अभंगातील 'एवढासा माझा भाव'<br>**प्रा. डॉ. कल्याण गोपनर** | १६-१८ |
| ५ | संत साहित्यातील समता विचार<br>**डॉ. लोकचंद राणे** | १९-२३ |
| ६ | कलियुगातील महान संत जनसेवानंद श्री सिद्ध सुभाष बाप्पा महाराज<br>**डॉ. घ. ना. पांचाळ** | २४-२६ |
| ७ | संत कान्होपात्राच्या अभंगातील करूणा भाव<br>**डॉ. सुशील प्रकाश चिमोरे** | २७-३१ |
| ८ | संत तुकारामांच्या अभंगाची भाषा<br>**जयश्री सुरेश बावर** | ३२-३६ |
| ९ | संत चोखामेळा यांच्या साहित्यातील समतेचे विचार<br>**प्रा. वैभव नानासाहेब कांबळे** | ३७-३९ |
| १० | तुकारामांच्या अभंगातील निसर्ग आणि शेती विचार<br>**प्रा. डॉ. चंद्रकांत शेरखाने** | ४०-४३ |
| ११ | सतराव्या शतकात वैज्ञानिक विचारांना जोपासणारा संत - तुकाराम अंबिले<br>**प्रा. विजय डी. झुंजारराव** | ४४-४८ |
| १२ | संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन<br>**प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी** | ४९-५५ |
| १३ | वीरशैव तत्वज्ञानातील अष्टावरण संकल्पना<br>**डॉ. सौ. कुलकर्णी एस. एन.** | ५६-५९ |

AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ९. संत चोखामेळा यांच्या साहित्यातील समतेचे विचार

प्रा. वैभव बाळासाहेब [illegible]
श्रीमती विजयादेवी देसाई विमिन्स कॉलेज, दौलतनगर, ता. पाटण, जि. सातारा.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. साहजिकच संतांच्या कार्याला विचारांचे अधिष्ठान असणे क्रमप्राप्त ठरते. 'ज्ञानेश्वरी' या अभिजात साहित्यकृतीची तेराव्या शतकात निर्मिती झाली. भागवत धर्माला स्वतःचे तत्त्वज्ञान प्राप्त करून दिले.याच काळात अनेक संत मंडळी उदयास आली. नामदेव, गोरा कुंभार, चोखोबा, बंका, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, जनाबाई अशा विविध धर्मातील व जातीतील संतांचा समावेश आहे. सदर शोध निबंधामध्ये संत चोखामेळा यांच्या कार्याचा मागोवा घेतला आहे.

संत चोखामेळा यांचा जीवन परिचय

संत चोखामेळा यांचे नाव चोखोबा महार असून त्यांचे जन्म वर्ष नेमके सांगता येत नाही परंतु त्यांचा मृत्यू इ.स. १३३८ साली झाला.चोखोबांच्या जन्मस्थानाविषयी मतभेद असल्याचे दिसते. [illegible] बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुणा किंवा मेहुणपुरी या गावी झाला, तर संत महिपती यांचे मतानुसार त्यांचे जन्मस्थान पंढरपूर असे सांगितले जाते.त्यांची पत्नी सोयरा, बहीण निर्मळा, मेहुणा बंका व मुलगा कर्ममेळा हे सर्व प्रपंचासाठी काबाडकष्ट करीत असताना [illegible] व भक्तिभावाने पांडुरंगाचे नामस्मरण व गुणसंकीर्तन करीत.त्यांचा मृत्यू गावकुसाच्या कामात भिंतीच्या ढिगाखाली सापडून झाला.सामाजिक विषमतेमुळे शुद्र- अतिशुद्र, गावगाडा, समाज जीवन ,भौतिक व्यवहार, उच्चनीचता, वर्णव्यवस्था यांचे चोखोबांच्या काव्यात दर्शन घडते.

संत चोखोबांचे वाङ्मय संपदा

'सकलसंतगाथे' त चोखोबांच्या नावावर ३४९ अभंगाची नोंद आहे. याशिवाय 'विवेकदर्पण' हे प्रकरण त्यांच्या नावावर सापडते. त्यांचे अभंग वारकरी पंथात लोकप्रिय आहेत.

वारकरी संप्रदायात विविध जाती धर्मांच्या संतांचा समावेशः

१३ वे शतक महाराष्ट्रात अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या काळात यादवांची सत्ता होती. ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सिद्ध केला आणि भागवत धर्माला स्वतःचे तत्त्वज्ञान प्राप्त करून दिले.' ही बाब लक्षणीय म्हणावी लागेल.संत नामदेव, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, चोखा महार, जनाबाई इ. अनेक संत समाजातील विविध थरातून आले होते.संत चोखोबांनी अनुभवलेली अस्पृश्यतेचे, विषमतेचे, मानहानीचे प्रसंग अभंगातून व्यक्त होताना दिसते.त्यांच्या शब्दाशब्दातून जे दुःख झिरपते ते अंतःकरणाला भावून भिडते. ही त्यांची युगानुयुगाची चिरवेदना अभंगातून व्यक्त होते.

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

सामाजिक दुःखाची वेदना ही दलितांच्या वेदनेचे आदिरुपः

संत चोखामेळा यांच्या साहित्यातील वेदना ही वैयक्तिक स्वरुपाची नव्हती तर ती सामाजिक स्वरुपाची होती. ते आपल्या जमातीचे दुःख तीव्रतेने, उत्कटतेने व्यक्त करतात.

'ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा
चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा'

असा आर्त स्वर त्यांच्या कवितेत उमटतो. ज्ञानदेवांचे विचार हेच त्यांचे बळ होते.[2] वर्णव्यवस्थेमुळे व जाती व्यवस्थेमुळे जी दुःखे चोखोबांच्या वाटयाला आली त्या दुःखांवर उपाय नव्हता.पूर्वजन्मीच्या पापामुळे माणूस दुःख भोगतो असे म्हणणे म्हणजे शुद्ध वेडगळपणा होता. पण त्या काळात अशा भोळया भाबडया समजुतींना कवटाळून बसण्याची समाजाची प्रवृत्ती दिसते.या प्रवृत्तीचे दयोतक असणारे चोखोबा म्हणतात,

'आमुचे संचित जैंसे जैंसे आहे । तेथे तो उपाय नचले काही
कर्माचे संचित प्रारब्धाचे भोग । न सुटे भागा भाग निढळीचा '

सर्व माणसे ही परमेश्वराची लेकरे आहेत. परमेश्वराची भक्ती करण्यास जातिभेद अडसर होत नाही. आपल्या 'हीनत्वाची' वेदना चोखोबांच्या अभंगातून जाणविते.त्यांच्या गळयात पांडुरंगाचा हार दिसला म्हणून सवर्णांनी अनन्वीत छळ केला.

'धाई धाई विठु चालू नको मंद । मज मारिती बडवे काहीतरी अपराध
विठोबा हार तुझ्या कंठी कैसा आला। शिव्या देऊनी मारा म्हणती देव का बाटविला'

या चोखोबांच्या फिर्यादीची कोणीही दखल घेत नाही. कारण तत्कालीन हिंदू समाज अस्पृश्यांना हीन वृत्तीने वागवित होता.

सामाजिक प्रथा, परंपरा व अन्यायी वृत्तीचा अभंगातून परखड समाचारः

'हीन याती माझी देवा । कैसे घडी तुझी सेवा
मज दूर दूर हो म्हणती ।तुज भेटू कवण्या रीती'

समाजात हीन यातीमुळे मिळणारी अवमानकारक वागणूकीची व्यथा ते अभंगातून व्यक्त करतात. त्यांच्या अन्यायाविरुद्ध बंड करण्याची शक्ती नव्हती.[3] वर्षानुवर्षे सामाजिक, आर्थिक गुलामगिरी सहन करणा-या समाजात विद्रोहाची ठिणगी पडण्याचा काळ दूर होता. अस्पृश्यांना मिळणारी समाजातील वागणूक, चालीरिती, प्रथा, परंपरा यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न चोखोबांनी केला. सामाजिक, आर्थिक पिळवणूकग्रस्त समाजाला संतांनी भक्तिमार्ग दाखविला. समाजातील दुष्ट प्रवृत्तींचा, ढोंगांचे वाभाडे काढण्याचे काम चोखोबादी संतांनी केले.

'विटाळ' सारख्या खुळचट कल्पनेचा चोखोबांनी परखडपणे समाचार घेतला आहे. अस्पृश्यांचा स्पर्श वाईट असतो. त्याने माणूस भ्रष्ट होतो. अशा परंपरेचा काव्यातून समाचार घेताना म्हणतात,


... Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal No. : 40776

'विटाळ विटाळ घवदाही भुवनी । स्थावर जंगम व्यापुनी
दुःखाशी विटाळ, सुखाशी विटाळ । विटाळी विटाळ वाढयाचे
विटाळाचे अंगी विटाळांचे फळ । चोखा तो निर्मळ नाम गाय'

श्री. म. माटे यांनी मात्र 'महार संतांचे सामाजिक दुखणे' या लेखात स्पष्ट केले आहे की, चोखोबांच्या मनाचे सामाजिक दुःख व्यक्त करणारे बरेचसे अभंग आहेत व हे अभंग चोखोबाने अतिशय तळमळीने आणि कष्टी मनाने गाईलेले आहेत." चोखोबा व अन्य समकालीन संत हे अन्यायाविरुद्ध वा छळाविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले नाहीत. त्यांनी दंभावर, ढोंगावर वाणीचे कोरडे ओढले पण अपमानीत जीणे विसरण्यासाठी ते विठ्ठलाच्या दरबारी आले.

म्हणून न्या.रानडे म्हणतात, 'जातिजन्य श्रेष्ठत्वाच्या वेडगळ कल्पनेचा जोर कमी झाला आणि शूद्र वर्गाला पारमार्थिक शिक्षण देऊन त्यांचे समाजामध्ये ब्राम्हणाचे तोडीस आणून बसविले" थोडक्यात वारकरी संप्रदायाने साधे आचरण, निर्मळ अंतःकरण व निष्ठायुक्त भक्ती या तत्त्वांच्या आधारे समाज प्रबोधनाचे कार्य केले.

सामाजिक पुनरुत्थानाची मुहूर्त मेढ रोवली गेली.सामाजिक वेदना काव्यातून व्यक्त करून सामाजिक विषमतेचे स्वरुप व परिणामाविषयी लोकजागृती केली, यामध्ये चोखोबांचे कार्य आदर्शवत असेच आहे.

संदर्भः

१. दलित साहित्य वेदना व विद्रोह, भालचंद्र फडके, श्रीविदया प्रकाशन
२. जातिअंताचे समाजशास्त्र, प्रा.संजयकुमार कांबळे, डायमंड पब्लीकेशन
३. दलित चळवळ आणि साहित्य, डॉ. कृष्णा किरवले, प्रतिमा प्रकाशन

IJARESM Menu

- Publication Ethics
- Peer Review & Publication Policy
- Call For Papers
- Why IJARESM
- Topics Covered
- Special Issue

Download

- Author Guidelines
- Copyrights Form
- Paper Template

Latest News
Posted Date : 09th Sep, 2022

**IJARESM Publication have various tie ups with many Conference/Seminar ...**
More...

IJARESM Conference March 2022

# Search Result

You Are Here : > **Search Result**

Total Records : 18 Records

| | |
|---|---|
| Title | "यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य" |
| Author | प्रा.डॉ. सुनिल संभाजी साठे |
| Country | India |

View DOWNLOAD

| | |
|---|---|
| Title | यशवंतराव चव्हाण आणि पंचायतराज |
| Author | प्रा. डॉ. मधुकर रामचंद्र साठे |
| Country | India |

View DOWNLOAD

| | |
|---|---|
| Title | यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य |
| Author | डॉ .नामानंद गौतम साठे |
| Country | India |

View DOWNLOAD

Total Records : 18 Records

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

# "यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य"

प्रा.डॉ. सुनिल संभाजी साठे

श्रीमती विजयादेवी देसाई, सिनिअर कॉलेज, दौलतनगर (मरळी), ता. पाटण, जि. सातारा.

****************

## प्रस्तावना

संयुक्त महाराष्ट्राचे व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये ओळखले जाते. ग्रामीण भागातील लोकशाही सशक्त व बळकट करावयाची असेल तर राज्यकारभाराबरोबरच सत्ता व नेतृत्व यांचेही विकेंद्रीकरण करावे लागेल या सुत्रानुसार त्यांनी महाराष्ट्राचे राजकारण केले परिणामी शोषीत , उपेक्षित व सर्वसामान्य समाज घटकातील अनेक तरुणांना महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये व सत्तेमध्ये नेतृत्व करण्याची संधी मिळाली. महाराष्ट्राच्या राजकारणावर यशवंतराव चव्हाणांचे दिर्घकाळ वर्चस्व राहीले असून , त्यांनी मराठा कुणबी समाज हा आपल्या राजकारणांचा पाया बनविला. त्याचबरोबर महाराष्ट्रातील विविध भागात संख्यात्मक ताकद असणारे शेतकरी , माळी, धनगर, तसेच मांग, बौध्द चर्मकार या दलित जातींना आपल्या सोबत घेऊन 'एकजात वर्चस्व बहुजातीय सहमती' याच्या आधारावर महाराष्ट्राचे राजकारण उभे केले. त्याचबरोबर चव्हाणांनी 'मराठी वर्चस्व सत्ता' राजकारणाला व्यापक व सर्वसमावेशक स्वरुप प्राप्त करुन दिले. त्यासाठी 'विकेंद्रीत लोकशाही ' आणि सहकारी संस्थातील सत्तापदे मिळविण्यासाठी विविध जातीय 'अभिजनांना' सत्तास्पर्धेत सहभागी होण्याची संधी प्राप्त करुन दिली व बेरजेच्या राजकारणाची सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेल्या राजकीय कार्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.
प्रस्तुत शोध निबंधात पुढील उददीष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

१ यशवंतराव चव्हाण याच्या राजकीय कार्याचा आढावा घेणे.
२ यशवंतरावांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे .
३ बेरजेच्या राजकारणाचा अभ्यास करणे.

अभ्यासाची गृहितके
१ यशवंतराव चव्हाणांचे राजकीय कार्य सर्वव्यापी होते.
२ यशवंतराव चव्हाणांनी मंडळे व महामंडळांची निर्मिती केल.
३ अनेक जाती धर्मांच्या लोकांना एकत्रीत करुन एक जात वर्चस्व बहुजातीय समंती अशा बेरजेच्या राजकारणाची सुरुवात केली.

## माहितीचे संकलन

यशंवतराव चव्हाण यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास करताना तत्कालीन ऐतिहासिक नोंदी तसेच त्यांच्या कार्यावर लिहलेली अनेक पुस्तके, संदर्भ ग्रंथ मासिके, पाक्षिके, इंटरनेट या दुययम साधनांचा शोध निंबधासाठी वापर करण्यात आला आहे. १
शोधनिंबधाचे स्पष्टीकरण

➢ **यशवंतरावांच्या राजकीय कार्याची सुरुवात:-**

'सह्याद्रीचा बुलंद आवाज म्हणून परिचित असलेल्या यशवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च, 1913 रोजी देवराष्ट्रे येथे झाला. अतिशय गरीब कुटुंबात जन्मलेल्या यशवंतरावांनी बी.ए.ची. पदवी घेतली , त्यानंतर ते एल.एल.बी. झाले. शालेय जिवनापासूनच ते सार्वजनिक क्षेत्राशी समरस झाले. महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या 'असहकार' आंदोलनात भाग घेतल्याबद्दल 1930 मध्ये त्यांना 18 महिने कारावास भोगावा लागला. सन 1940 मध्ये यशवंतराव 'सातारा जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष ' झाले. राजकीय कारकिर्दीतील या पहिल्या पदापासून चव्हाणांनी आपला राजकीय प्रवास सुरु केला. त्यानंतर त्यांनी राजकारणात कधी मागे वळून पाहिलेच नाही , यशवंतराव सर्वप्रथम 1946 मध्ये आमदार झाले. 'दक्षिण सातारा' मतदार संघातून निवडून आलेल्या यशवंतरावांची तत्कालीन गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी 'पार्लमेंटरी' सचीव म्हणून निवड केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अस्तित्त्वात आलेल्या द्विभाषिक मुंबई राज्याच्या विधानसभा निवडणूकीत ते 'कराड-मतदार संघातून निवडून आले आणि मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या मंत्री मंडळात 'नागरी पुरवठा' समाज कल्याण व वनखात्याचे' मंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला. सन 1953 मध्ये विदर्भाचा महाराष्ट्रात समावेश होण्याबाबत झालेल्या नागपूर करारात त्यांचे मोठे योगदान होते. सन 1957 कराडमधून यशवंतराव पुन्हा निवडून आले. आणि कॉंग्रेस संसदिय पक्षाच्या नेतेपदी' निवड होऊन द्विभाषिक मुंबई राज्याचे ते 'मुख्यमंत्री' बनले सन 1957 ते 1960 ' या कालखंडामध्ये ते द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री होते.२

➢ **महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री:-**

यशवंतराव चव्हाण यांचा मुख्यमंत्रीपदाचा कालखंड हा विशाल द्विभाषिक मुंबई राज्य 1 नोव्हेंबर, 1956 ते 1 मे, 1960 आणि संयुक्त महाराष्ट्र राज्य 1 मे 1960 ते 19 नोव्हेंबर 1962 असे मिळून साडे सहा वर्षे तर महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर आडीज वर्षे असा त्यांचा मुख्यमंत्री पदाचा कालखंड होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हाच त्यांच्या व महाराष्ट्राच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा कालखंड होय. तथापी त्यांच्या या कारकिर्दीचे मुल्यामापन करताना आडीज वर्षापुरते सीमित न राहता द्विभाषिकांचे मुख्यमंत्रीपद आणि त्या आधीची जडणघडण विचारात घेतली नाही , तर हे मुल्यमापन अपुरेच राहील, त्याचे कारण असे की , वादग्रस्त द्विभाषिकाच्या काळातील वादळी घडामोडीतून झालेली महाराष्ट्र राज्याची निर्मिती ही एक ऐतिहासिक गोष्ट होती आणि त्या राज्याचे मुख्यमंत्रीपद हे सर्वसामान्यपद-हस्तांतर नव्हते. त्यामुळे चव्हाणांचे द्विभाषिक काळातील कर्तत्व व राजकारण तसेच त्यांचे व्यक्तिमत्त्व याचा नव्या राज्यावर खोल परिणाम होता. ३

यशवंतरावाची द्विभाषिकांच्या मुख्यमंत्रीपदी निवड होण ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील कांतीकारक घटना होती. गरीब , भूमिहीन कुटुंबात, जन्म झालेला सत्ता , राजकारण, शिक्षण यांचा वारसा व आर्थिक बळ याचा कुठल्याही प्रकारचा पाठींबा नसलेला आणि वंशपरंपरा नसलेला माणूस केवळ स्वतःच्या कर्तृत्त्वावर आजपर्यंत एवढ्या महत्त्वाच्या सत्तास्थानी भारतात कधी आला नव्हता , मुंबई व महाराष्ट्रातील सत्ता वर्तु ळात त्यावेळी सुशिक्षित , शहरी, बुध्दीजीवी, मध्यमवर्गाचे, व्यापारी आणि भांडवलदार वर्गाचे वर्चस्व होते. शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून ग्रामीण , धनवान किंवा सरदार कुलीन जमिनदार होते. खरे अशा परिस्थितीमध्ये ज्याच्या आईने मुलाच्या शिक्षणासाठी अक्षरशः मोलमजुरी केली आहे , अशा शेतकऱ्याचे पोर मुख्यमंत्रीपदी येणे ही साऱ्या वातावरणाला कलाटणी देणारी आणि भारतीय लोकशाहीची सक्षमता अधोरेखित करणारी घटना होती.

महाराष्ट्राची सत्ता सन 1956 पासूनच यशवंतरावांकडे होती. त्यांच्या कारकिर्दीत आर्थिक क्षेत्रात , सहकार, कृषी, औद्योगिक समाजरचना, सामाजिक क्षेत्रात दलित, मागासवर्गीय यांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रात 'महाराष्ट्र

राज्य' साहित्य संस्कृती मंडळ ' विश्वकोष निर्मिती मंडळ , नाट्य, चित्रपट, लोककलांसाठी शासकीय मदत व पुरस्कार यासारखी दिर्घ परिणाम करणारी धोरणे सर्वच क्षेत्रात स्वीकारली गेली. जिल्हा परिषद कायदा व त्यानुसार झालेल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या स्थापना यातून लोकशाही विकेंद्रीकरणाचे पुढचे पाऊल पडले. सहकारी चळवळीला राज्यशासनाकडून प्रोत्साहन भांडवल पुरवठा मिळाल्याने तालुका पातळीवर धाडसी धडाडीने निर्णय घेणारे लोकांमधून वर आलेले असे नवे नेते निर्माण होऊ लागले.४ राजकीय प्रक्रिया अगदी गावपातळी , तळागाळापर्यंत पोहचली. त्यामुळेच राजकारणावरील लोकांच्या आशा आकांक्षा दबाव वाढला परिणामी लोकांना जबाबदार असणाऱ्या राजकीय नेतृत्त्वाला लोकांचा प्रतिसाद राहीला व त्यातूनच राज्यकर्त्यांची नवी फळी उभी राहीली.

महाराष्ट्राच्या सर्वांगीन विकासासाठी केलेले कार्य :-

यशवंतराव चव्हाण यांनी सन 1960 ते 1962 या दोन वर्षात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक मुलभूत स्वरुपाच्या संस्थांची स्थापना केली. यामध्ये प्रामुख्याने साहित्य , संस्कृती, उद्योग, लघूउद्योग, सहकारी क्षेत्रात नवे रचनात्मक युग आरभण्यासाठी पुढील मंडळे व महामंडळे स्थापण्याचे निर्णय घेतले. त्यामध्ये 'महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड' (1 मे 1960) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (20 जून, 1960) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ (1960), महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ ( 1960), महामंडळे - (मर्यादीत : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ( 1 जुलै 1961), महाराष्ट्र राज्य वित्त मंडळ ( 1 एप्रिल 1962) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ ( 1962) , महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ (ऑक्टोंबर 1962) महाराष्ट्र राज्य, औद्योगिक विकास महामंडळ (1ऑगस्ट 1962) महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ ( 1962) ५ अशाप्रकारे यशवंतराव चव्हाणांनी मंडळ व महामंडळांची स्थापना करुन समाजाचा सर्वांगीन विकास साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वेगवेगळ्या समाजघटकांचे वेगवेगळे प्रश्न मार्गी लागण्यात मदत झाली.

- **यशवंतराव चव्हाण यांचे लोकशाही विषयीचे विचार:-**

यशवंतराव चव्हाणांना प्रशासनाचा प्रदिर्घ अनुभव होता , त्यामुळे लोकशाहीमध्ये प्रशासन कसे चालले पाहिजे , याबाबत त्यांनी चिंतन केले व त्याप्रमाणे प्रशासनाला मार्गदर्शन केले 'लोकांचे लोकांसाठी आणि लोकांनी चालविलेले शासन ही लोकशाहीची व्याख्या केवळ औपचारीक असून , त्यातून लोकशाही कार्यपध्दतीचा बोध होत नाही , असे यशवंतराव मानतात. आणि पुढे म्हणतात 'प्रशासनातील लोकशाही म्हणजे एकमेकांच्या सतत विचारविनिमयाने चालणारा राज्यकारभार होय. कोणत्याही प्रकारचा साचेबंद दृष्टीकोन न ठेवता लोकांचे प्रतिनिधी एकत्र येऊन जिथे विचार विनिमय करतात. अशा शासनाच्या पध्दतीला मी लोकशाही म्हणतो. लोकशाहीत जनतेच्या मुलभूत प्रश्नांसंबंधी एकवाक्यता व्हावी व ते सोडविले जावेत , म्हणून चर्चा करुन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जातो.

भारतात लोकशाही दृढ व्हायची असेल तर सर्वसामान्यांच्या हातात सत्ता पोहचली पाहिजे अशी त्यांची धारणा होती. त्यासाठी लोकशाहीचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यामुळेच 'बळवंतराय मेहता' समितीने पंचायत राज्यांसंबंधी शिफारसी केल्या नंतर यशवंतरावांनी राजस्थान पाठोपाठ महाराष्ट्रात पंचायती व्यवस्थांचा अंमल सुरु केला.६ यशवंतराव चव्हाण हे एक आगळेवेगळे व्यक्तीमत्व होते. त्यांनी केवळ महाराष्ट्र राज्याचेच नव्हे तर संपूर्ण देशाच्या विकासाला व राजकारणामध्ये फार मोठे योगदान दिले. यशवंतरावांनी लोकसभेमध्ये खासदार म्हणून सलग पाच वेळा प्रतिनिधित्व केले. राज्य सभेतही ते सदस्य होते. त्यांनी केंद्रिय मंत्रीमंडळामध्ये संरक्षण , गृह, वित्त, परराष्ट्र, उप-पंतप्रधान अशी विविध खाती सांभाळली. ७

- **बेरजेचे राजकारण:-**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर काँग्रेस पक्षाचे नेतृत्त्व चव्हाण यांचेकडे देण्यात आले. त्यांनी बेरजेच्या राजकारणाचा अत्यंत प्रभावी वापर केला बेरजेचे राजकारण म्हणजे 'माणसे जोडणे' यशवंतरावांकडे नेतृत्त्व येताच त्यांनी मराठा नेतृत्त्वास काँग्रेसमध्ये येण्यास उदयुक्त केले. त्यामुळे केवळ शे.का.प.मधीलच नव्हे तर प्रजासमाजवादी व साम्यवादी पक्षातील बहूसंख्य मराठा नेते काँग्रेसमध्ये सक्रीय झाले. चव्हाणांनी त्यांना आधीकाराच्या जागा देऊन त्यांचा सन्मान केला. त्यांच्या पुरोगामी धोरणामुळे दलितांतील अनेक गट काँग्रेसमध्ये सामिल झाले. त्यामध्ये आर.डी.भंडारे , रुपवते यांचे गट काँग्रेसमध्ये विलीन झाले. तर 1976 साली गायकवाड गट , 1990 पासून रामदास आठवले गट असे अनेक गट त्यांनी काँग्रेसमध्ये आणून बेरजेचे राजकारण केले व महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाची पालंमुळं घट्ट केली.

## समारोप

अशाप्रकारे यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय कार्याचे स्वरुप राहिले असून , त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. अनेक विकास योजना राबविल्या , तसेच मंडळे, महामंडळे यांची निर्मिती करुन महाराष्ट्रातील हजारो लोकांचे प्रश्न मार्गी लावले. राज्यातील अनेक जाती-धर्मातील राजकीय गटांना एकत्रित करुन त्यांना काँग्रेसमध्ये सामील करुन पक्षवाढीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. बेरजेचे राजकारण करत असताना त्यांनी कोणत्याही समाजघटकांवर अन्याय होऊ दिला नाही. प्रत्येक नेत्याला राजकारणामध्ये व सत्तेमध्ये नेतृत्व देऊन त्यांचा सन्मान केला. समाजिक व राजकीय वारसा नसताना तत्कालीन महाराष्ट्राच्या सत्तावर्तुळामध्ये जमिनदार , भांडवलदार व व्यापारी वर्गाचे वर्चस्व असताना सुध्दा चव्हाणांनी आपल्या स्वकर्तृत्वाच्या जोरावर राजकारणातील अनेक महत्त्वाची पदे समर्थपणे सांभाळली. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदापासून ते केंद्रातील वित्त , संरक्षण आणि उप-पंतप्रधानपदी ही काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी केलेल्या देशपातळीवरील कामामुळे भारताच्या विकासात भर पडली. तसेच आंतर राष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा उंचावण्यातही त्यांचे योगदान महत्वपूर्ण ठरले आहे.

## निष्कर्ष

1) महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याची संधी चव्हाणांना मिळाली.
2) सामाजिक, शैक्षणिक व राजकीय वारसा नसताना सुध्दा यशवंतरावांनी मुख्यमंत्रीपदापासून ते केंद्रातील वित्त , संरक्षण आणि उप-पंतप्रधानपदापर्यंत मजल मारली.
3) महाराष्ट्रातील वेगवेगळ्या राजकीय गटांना कॉंग्रेसच्या विचारधारेखाली आणून बेरजेचे राजकारण केले.
4) यशवंतरावांनी एकजात वर्चस्व आणि बहूजातीय सहमती या आधारावर महाराष्ट्राचे राजकारण उभे केले.
5) राजकारभाराबरोबरचं सत्ता व नेतृत्त्व यांचे विकेंद्रीकरण केले.

## संदर्भग्रंथ सूची

1) भांडारकर पु.ल "पु.ल. सामाजिक संशोधन पध्दती श्री. मंगेश प्रकाशन नगपूर १९७८ पृष्ठ क्र.
2) पाटील मनोज 'महाराष्ट्रातील राजकीय घराणी' अदिश्रेय प्रकारात पुणे 2019 प्र.क्र. 9, 10.
3) साधू अरुण "यशवंतराव चव्हाण, राजकीय शिल्पकार" लोकसत्ता दिवाळी अंक, 2010, प्र.क्र. - 10.

4) भोले भा.ल.बेडकीहाळ, किशोर (संपादक) "बदलता महाराष्ट्र (साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा, एन.डी.पाटील गौरव ग्रंथ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी प्रकाशन सातारा, 2003 प्र.क्र. 8.

5) माने पी.एम. 'यशवंतराव चव्हाण आणि सामाजिक परिवर्तन ' समाज प्रबोधन पत्रिका जानेवारी - मार्च , 2019, वर्ष - 51, प्र.क्र. 102.

6) पाटील भारती, यशवंतराव चव्हाणांचे राजकीय विचार, "समाज प्रबोधन पत्रिका, जानेवारी-मार्च, 2013 वर्ष 51, प्र.क्र. 76.

7) प्रा.पाटील अ.शि."साहित्यप्रेमी यशवंतराव चव्हाण," कोयनातीर स्मरणीका, 2016, प्र.क्र. 69.